# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with B++ grade

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**


जा.क्र./वि.वि.वि/२०२४–२५/८६ दिनांक : ०८/१०/२०२४

अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे

प्रति,

मा. संचालक/प्राचार्य/सांस्कृतिक विभागप्रमुख/संघव्यवस्थापक,
सर्व सलंग्नित महाविद्यालये व विद्यापीठ उपपरिसर लातूर,परभणी.

**विषय: आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ' युवक महोत्सवाच्या'लॉट्स संदर्भात संघव्यवस्थापक /सांस्कृतिक विभागप्रमुखांच्या बैठकीबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२४–२५ चा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव **'ज्ञानतीर्थ'** सहयोग सेवाभावी संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, विष्णुपूरी, नांदेड येथे **दि. १८ ते २१ ऑक्टोबर,** २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. प्रस्तुत आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात प्रवेशित महाविद्यालयांना अनुसरून लॉट्स पाडून वेळाप्रत्रक तयार करणे आवश्यक आहे.

या संदर्भात सांस्कृतिक समन्वयकांची बैठक दिनांक **१४ ऑक्टोबर,** २०२४ रोजी सकाळी ११.३० वा. प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. अधिसभा सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. तरी प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या **सांस्कृतिक विभागप्रमुख/संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांच्यापैकी एका व्यक्तीस प्रस्तुत बैठकीस उपस्थित राहण्यासाठी पाठवावे.**

**सदरील बैठक ही युवक महोत्सवात सहभागी महाविद्यालयाच्या लॉट्स आणि सादरीकरणासंदर्भात असल्याने बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. प्रस्तुत बैठकीस उपस्थित असणाऱ्या सांस्कृतिक समन्वयकांच्या समक्ष पाडण्यात आलेले लॉटस सहभागी सर्व महाविद्यालयाच्या संघासाठी अंतिम असतील. लॉट्स पाडून वेळापत्रक अंतिम केल्यानंतर आपली कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही. या लॉट्स आणि वेळापत्रकाप्रमाणेच युवक महोत्सवात दि. १८ते २१ ऑक्टोबर, २०२४ दरम्यान संबंधित महाविद्यालयांनी सादरीकरण करणे बंधनकारक आहे.** याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

**टिप: सदरील बैठकीस उपस्थित सांस्कृतिक विभागप्रमुख/संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांचा प्रवासखर्च व दैनिक भत्ता संबंधीत महाविद्यालयांनी अदा करावा.**


डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.


प्रत महितीस्तव :

सीस्टीम एक्सपर्ट, (संगणक विभाग) सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आंतरमहाविद्यालयीन ज्ञानतीर्थ युवक महोत्सव 'लॉट्स संदर्भात सांस्कृतिक विभागप्रमुख /संघव्यवस्थापकाच्या **बैठकीबाबत** या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration आणि Students Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.